साप्ताहिक
# विश्वनायक
Email: vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख • VISHVANAYAK Mo.8686888898




■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - १४ ■ मंगळवार दि.३१ मार्च २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 14 ■ Tuesday Dt. 31 March 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

# कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याला वादाच्या भोवऱ्यात ओढण्याचा प्रयत्न!

## पीआय शितलकुमार बल्लाळ यांना मुद्दामहून टार्गेट करण्याचा डाव

### त्यांनी इतर उत्सव, इफ्तार पार्टी आणि महापुरुषांच्या जयंती केलेल्या चालतात मग याच वेळी विरोध कशासाठी?

### पोलीस गणवेशात इफ्तार व जयंत्या चालतात, मग 'जय श्रीराम'च्या घोषणेचाच पोटशूळ का?



**बीड । विश्वनायक न्यूज**

**बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्यावर 'जय श्रीराम' घोषणा दिल्याच्या कारणावरून सुरू झालेल्या वादाला आता नवे वळण मिळाले असून, या प्रकरणात त्यांना हेतुपुरस्सर टार्गेट केले जात असल्याचा आरोप पुढे येत आहे. काही जणांना श्री बल्लाळ यांना टार्गेट करण्यासाठी केवळ निमित्त हवे होते म्हणूनच त्यांनी हे अत्यंत साधे आणि कोणाचाही आक्षेप नसणारे प्रकरण उचलून धरत त्यांच्यावर टीका सुरू केली आहे. त्यांनी आजवर सगळ्याच धार्मिक उत्सवात सहभाग नोंदवलेला आहे त्याचे फोटो सुद्धा उपलब्ध आहेत. मात्र त्यावेळी तसा आक्षेप कोणीच घेतला नाही. मात्र याच वेळी त्यांना टार्गेट केले जात असून त्या पाठीमागे काही जणांचा डाव असल्याची चर्चा बीडमध्ये होत असून आता त्याबाबत संतापही व्यक्त होताना दिसत आहे.**

कर्तव्यदक्ष आणि निःपक्षपाती अधिकारी म्हणून ओळख असलेल्या शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांच्या समर्थनार्थ बीडकरांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. रामनवमीच्या रॅलीदरम्यान वर्दीत असताना बल्लाळ यांनी 'जय श्रीराम'ची घोषणा दिल्याचा मुद्दा उपस्थित करत काहींनी त्यांच्यावर आक्षेप घेतला. मात्र, याच अधिकाऱ्याने आजवर पोलीस ठाण्यात सर्व धर्मांचे सण-उत्सव आणि महापुरुषांच्या जयंती उत्साहात साजरे केले असल्याची बाब नागरिकांकडून ठळकपणे मांडली जात आहे. इफ्तार पार्टीपासून ते शिवजयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गणेशोत्सव, रक्षाबंधन यांसारख्या विविध कार्यक्रमांत बल्लाळ यांनी पुढाकार घेत सर्वधर्मीय एकोपा जपला. त्यामुळे एका घोषणेवरूनच त्यांच्यावर टीका होणे अन्यायकारक असल्याचे मत व्यक्त होत आहे. बल्लाळ यांनी आपल्या कार्यकाळात कधीही जात-पात किंवा धर्म पाहून कारवाई केली नाही. त्यांच्या दृष्टीने गुन्हेगार हा केवळ गुन्हेगारच असल्याने सर्व समाजघटकांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वासाचे वातावरण आहे. असे असताना त्यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न काही हितशत्रूंकडून होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दरम्यान, वर्दीत असताना कोणतीही धार्मिक घोषणा देणे नियमबाह्य ठरू शकते, हे मान्य करतानाच, अशा एका घटनेचे अतिरंजित राजकारण करू नये, अशी भूमिका सर्वसामान्यांकडून व्यक्त होत आहे.

### सर्वधर्मीय सण साजरे करणाऱ्या अधिकाऱ्यावर एकाच घोषणेचा ठपका; बीडमध्ये संतापाची लाट

पोलीस निरीक्षक श्री बल्लाळ हे आपल्या कर्तव्याप्रती अत्यंत कठोर असल्याचे सर्वांना ठाऊक आहे. आपल्या कर्तव्यात कसूर न ठेवता ते नियमाने काम करतात आणि याचेच दुखणे काही लोकांना आहे. त्यांनी कुठल्याही धर्मात जातीमध्ये भेदभाव पाळला नाही. कोणत्याही समाजाचा सण उत्सव असो ते त्यात सहभाग घेतातच आणि स्वतः पुढाकार घेत सामान्य जनतेप्रमाणे प्रार्थना करतात. हे आजवरच्या अनेक कार्यक्रमातून दिसून आले आहे. अशा अधिकाऱ्याला याच एका घटनेवरून नियम मोडल्याचा ठपका ठेवून टार्गेट करणे हे चुकीचे आहे. यामुळेच बीड करातून संताप व्यक्त होत आहे.



### पराचा कावळा न करता वास्तव बघा...

श्री बल्लाळ यांना स्वतःची वैयक्तिक कामे सांगण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. मात्र नियमाला धरून काम करणारे बल्लाळ यांनी त्यांची कामे करण्यास नम्रपणे नकार दिला. याचाच राग मनात धरून, काहीजण त्यांना आत्ताच्या क्षुल्लक कारणावरून टार्गेट करताना दिसत आहेत. मात्र या लोकांनी उगीचच पराचा कावळा करण्याअगोदर वास्तव तपासणे गरजेचे आहे. ही साधी बाब सामान्य जनतेच्या पूर्णपणे लक्षात आली असून, जे या प्रकरणाला हवा देण्याचा प्रयत्न करीत आहेत, आता बीड मधून त्यांच्या विरोधात संताप व्यक्त होऊ लागला आहे. जे त्यांच्यावर आरोप करीत आहेत ते किती शुद्ध हेतूने काम करतात आणि ते याचवेळी का जागे झाले? बल्लाळ यांनी इतर सण उत्सव आणि महापुरुषांच्या जयंती करत असताना हे कुठे गेले होते ? असा सवाल आता जनता विचारू लागली आहे.






### पोलीस अधीक्षकांकडे जनतेची मोठी मागणी...

बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी या प्रकरणाची सखोल तपासणी करावी अशी मागणी जोर धरत आहे. यापूर्वी पोलीस ठाण्यात झालेल्या इफ्तार पार्टी, विविध जयंत्या आणि सण-उत्सव या सर्वांचा आढावा घ्यावा. पोलीस निरीक्षक बल्लाळ हे सर्वच धर्मांना समान न्याय देणारे अधिकारी असताना, त्यांना बळीचा बकरा बनवले जाऊ नये. सत्य काय आहे ते समोर येऊ द्या, पण एका घोषणेवरून कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यावर अन्याय झालेला जनता सहन करणार नाही, असा आक्रमक पवित्रा आता बीडमधील नागरिकांनी घेतला आहे.

---

## अवैध गुटखा वाहतुक करणाऱ्यांवर माजलगाव शहर पोलीसांची कारवाई



**माजलगाव । प्रतिनिधी**

दि.२७/ मार्च/२०२६ रोजी गोपनिय माहितीच्या आधारे माजलगाव शहर पोलीसांनी गुटखा वाहतुक करीत असलेली स्विफ्ट डिझायर कंपनीची गाडी पासिंग नंबर चक१४ इठ ५२२९ ही ताब्यात घेवुन तिचेमध्ये मिळुन आलेला किंमती १,६२,०००/- रुपयेचा डायरेक्टर कंपनीचा गुटखा, ८१,०००/- रुपयेचा शॉट कंपनीची सुगंधीत तंबाखु व ४,००,०००/- रुपये किंमतीची चारचाकी गाडी असा एकुण किंमती ६,४३,०००/-रुपयेचा मुद्देमाल जप्त करुन मिळुन आलेला आरोपी नामे नवीद अन्वर शेख रा. पात्रुड ता. माजलगाव जि. बीड व दोन फरार आरोपी अशा तीन आरोपीतांविरुध्द गुरनं ८४/२०२६ कलम १२३, २७४, २७५, ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी नवीद अन्वर शेख रा. पात्रुड ता. माजलगाव जि. बीड यास सदर गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आले असुन पुढील तपास पोउपनि संदीप राठोड हे करत आहेत.

सदरची कारवाई नवनीत कॉवत साहेब पोलीस अधीक्षक बीड, चेतना तिडके मॅडम अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोउपनि संदीप राठोड, पोह गणेश तळेकर, पोह आसलम शेख, पोकॉ महादेव बहिरवाळ, पोकॉ अंगद घोडके व पोकॉ सुनिल गवळी सर्व नेमणुक पोलिस स्टेशन माजलगाव शहर यांनी कारवाई केली आहे.

---

# बीड पोलिसांच्या 'आश्वासनांचे' श्राद्ध!

## पत्रकार आत्माराम वाव्हळ यांची दुचाकीनंतर आता मोबाईललाही 'भावपूर्ण श्रद्धांजली'

### पोलिसांच्या हतबलतेवर सोशल मीडियातून सडकून टीका; १४-१५ वर्षांच्या कष्टाच्या कमाईवर चोरांचा डल्ला

**बीड । प्रतिनिधी**

रक्षणकर्तेच जेव्हा हतबल ठरतात, तेव्हा सामान्यांनी कुणाकडे पाहायचे? असा संतप्त सवाल बीडमधील पत्रकार आत्माराम वाव्हळ यांच्या एका 'श्रद्धांजली' पोस्टरमुळे उपस्थित होत आहे. तब्बल १४-१५ वर्षे विनाअनुदानित शाळेत विना पगारी काम करून, एक-एक रुपया जमवून त्यांनी घेतलेली त्यांची 'हिरो होंडा स्प्लेंडर चक-२३ -ड ९२५५' या क्रमांकाची मोटारसायकल आणि गेल्या वर्षी २८ मार्च २०२५ रोजी 'ओप्पो Reno ८' कंपनीचा स्मार्टफोन चोरीला गेला होता. परवा त्या घटनेला एक वर्ष पूर्ण झाले, तरीही त्याचा तपास लागला नाही, तब्बल एक वर्षानंतर आता पोलिसांच्या तपासावर विसंबून न राहता वाव्हळ सरांनी चक्क आपल्या लाडक्या मोबाईलचे 'श्राद्ध' घालत सोशल मीडियावरून आपले दुःख आणि संताप व्यक्त केला आहे.




बीड शहरातील पत्रकार आत्माराम वाव्हळ सरांनी अत्यंत कष्टाने घेतलेली 'हिरो होंडा स्प्लेंडर कंपनीची MH-23 -AS - 9255' या क्रमांकाची मोटारसायकल २०१७ साली चोरीला गेली होती. यासंदर्भात त्यांनी बीड शहर पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली होती. मात्र, अनेक वर्षे उलटूनही या चोरीचा तपास लावण्यात पोलिसांना सपशेल अपयश आले. अखेर, बरोबर एक वर्षांनी त्यांनी २०१८ मध्ये जड अंतःकरणाने आपल्या त्या लाडक्या दुचाकीचे 'श्राद्ध' घातले होते. ही घटना त्यावेळी संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली होती. दुचाकीच्या चोरीनंतर सावरून आत्माराम वाव्हळ सरांनी पुन्हा कष्टाने पैसे जमवून नव्याने दुसरी मोटरसायकल खरेदी केली. दरम्यान आजच्या काळात स्मार्टफोन ही प्रत्येक नागरिकांची काळाची गरज निर्माण झाली आहे. शिवाय प्रत्येक पत्रकारांना बातम्यांच्या संदर्भात अपडेट राहण्यासाठी पत्रकारांकडे स्मार्टफोन असणे फार गरजेचे झाले आहे. त्यामुळे त्यांनी Oppo Reno ८ कंपनीचा काळ्या रंगाचा स्मार्टफोन खरेदी केला होता. मात्र, अवघ्या काही दिवसातच म्हणजेच दिनांक २८ मार्च २०२५ रोजी त्यांच्या या मोबाईलवरही चोरांनी डल्ला मारला.

या चोरीची तक्रार त्यांनी शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली. पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी वारंवार संपर्क साधून, विनंती करूनही तपास यंत्रणेने कोणतीही हालचाल केली नाही. वर्षभर पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवूनही काहीच साध्य झाले नाही.

---

## फोटोसेशन आणि पुरस्कारापुरता वृक्षलागवडीचा दिखावा

### इव्हेंट जिल्हाधिकारी यांनी विवेक जागा ठेवून वृक्षसंगोपणाची जबाबदारी निश्चित करावी !




**बीड । प्रतिनिधी**

हरित महाराष्ट्र अभियानांतर्गत जागतिक विक्रमाच्या उद्देशाने एकाच दिवशी ३० लाख झाडे लावण्याची मोहीम राबविण्यात आली होती. मात्र बीड प्रशासनाने प्रत्यक्षात ७० लाख झाडे लावल्याचा दावा करत विधानसभेत वनमंत्री गणेश नाईक यांची दिशाभूल केली. यासोबतच ९० टक्के झाडे जिवंत असल्याचा दावा देखील प्रशासनाने केला आहे.

प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळीच दिसून येत आहे. तत्कालीन उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लावलेले खंडेश्वरी दिपमाळ परीसरात झाड देखील जिवंत ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरल्याची टीका होत आहे. पाली येथील नविन रेल्वे स्थानक परिसरात उद्घाटनावेळी लावण्यात आलेली १२ ते १५ फूट उंचीची झाडे पाण्याअभावी वाळण्याच्या स्थितीत असल्याचे दिसून येत आहे. जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांच्या नावाचे फलक लावण्यात आलेल्या झाडांचेही संगोपन करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याची बाब समोर आली असून ही अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

हवामान बदल, प्रदूषण आणि जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केल्याचा गाजावाजा करण्यात आला. या उपक्रमाची नोंद 'इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये झाल्याचा दावा करत त्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन जिल्हाधिकारी यांचा सन्मानही करण्यात आला होता. दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत रस्त्याच्या कडेला १२ ते १५ फुट उंचीची मोठमोठाली झाडांची मोठ्या उत्साहात वृक्षलागवड करण्यात आली. या झाडांसोबत मान्यवरांच्या नावाच्या पाट्या लावण्यात आल्या होत्या.

---

# लाडक्या बहिणींना एसआयआर प्रक्रियेचा प्रचंड त्रास : एस.एम.युसूफ

**लाडक्या बहिणी जिथे राहतात तिथेच त्यांची नोंद एसआयआर मध्ये घ्या**

**बीड । प्रतिनिधी**

सध्या राज्यभरात एसआयआर अर्थातच स्पेशल इंटेन्सिव्ह रिविजन प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेसाठी शासनाकडून घालून दिलेल्या अटींचा लाडक्या बहिणींना प्रचंड मोठ्या प्रमाणात त्रास होत असून लाडक्या बहिणी जिथे राहतात तिथेच त्यांच्या नावाची नोंद घ्यावी आणि त्रासदायक नियम व अटी रद्द कराव्यात अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री, गृहमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मुख्य निवडणूक आयुक्त यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

याविषयी पाठविलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, दिनांक १ मार्च २०२६ पासून शासनाने स्पेशल इंटेन्सिव्ह रिविजन अर्थातच एसआयआर प्रक्रियेची अंमलबजावणी सुरू केली आहे. यासाठी सन २००० च्या मतदार यादी प्रमाणे नोंदी घेण्याचे आदेश बीएलओंना देण्यात आलेले आहेत. याकरिता नेमण्यात आलेले बीएलओ महिना संपला तरी अजूनही मतदारांच्या घरोघरी पोहोचलेले नाहीत. काही बीएलओ एखाद्या प्रभागात एखाद्या जागेवर बसून एसआयआर ची प्रक्रिया उरकून घेत आहेत.



मतदार यादी मध्ये अगोदरच मतदारांची नावे, पत्ते आणि वय यात खूप चुका आहेत. तसेच महिला मतदारांना एसआयआर मध्ये नाव नोंदणी करिता मोठ्या प्रमाणात प्रचंड त्रास होत आहे. २६ वर्षांपूर्वी त्या जिथे राहत होत्या तेथील मतदार यादी मधून त्यांची नावे काढायची आणि सध्या जिथे राहतात तेथील मतदार यादी मध्ये नोंद करायची. याकरिता पूर्वीचा रेकॉर्ड सध्याच्या राहत्या ठिकाणी आणायचा आणि तो बीएलओंना दाखवून मग त्यांची नोंदणी करायची. अशी ही क्लिष्ट प्रक्रिया शासनाने लाडक्या बहिणींच्या माथी मारली आहे.

शिवाय बरेच बीएलओ कामचुकारपणा करत अनेक महिला मतदारांची नावे जुन्या यादीतून जशीच्या तशीच उचलून जिथल्या तिथे मॅपिंग करू लागले आहेत. वास्तविक पाहता सन २००० साली ज्या महिला मतदार (तरुणी) आपापल्या माहेरी वास्तव्यास होत्या, तेथील मतदार यादी मध्ये त्यांची नावे आजही जशीच्या तशीच आहेत. अशा महिलांची नावे एसआयआर प्रक्रिये करिता नियुक्त केलेले अनेक बीएलओ जशीच्या तशी घेऊन मॅपिंग करू लागले आहेत. एकदा नावाचे मॅपिंग झाले की, मग त्या महिला आजमीतिला जिथे वास्तव्यास आहेत तिथे त्या महिला मतदारांची नावे एसआयआर प्रक्रियेत मॅपिंग होईना. यामुळे महिला वर्गात मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला आहे.

ही बाब जेव्हा समोर येऊ लागली तेव्हा अशा महिला पूर्वी वास्तव्यास असलेल्या ठिकाणी जाऊन तेथील मतदार यादीतून त्यांची नावे अनमॅप करण्याकरिता बीएलओ चा शोध घेत असताना असे बीएलओ शोधूनही सापडेनासे झाले आहे.

मुलींच्या लग्नानंतर जेव्हा ती सासरी जाते तेव्हा प्रत्येक महिलेचे आणि पुरुषाचे दोन्हीकडच्या म्हणजेच सासर आणि माहेर संबंध चांगले असतीलच असे नाही. नातेसंबंध टिकवताना अनेकदा खटके उडून एक दुसऱ्याच्या गावी जाणे, घरी जाणे बंद होऊन जाते. एवढेच काय एक दुसऱ्यांचे तोंड सुद्धा पाहत नाहीत. अशा अवस्थेस तोंड देणाऱ्या मतदारांना एसआयआर प्रक्रियेसाठी शासनाने घालून दिलेल्या अटी या महिला वर्गास म्हणजेच लाडक्या बहिणींना मोठ्या प्रमाणात त्रासदायक व जाचक ठरू लागल्या आहेत.

ज्यामुळे एसआयआर प्रक्रियेनुसार तयार करण्यात येणाऱ्या मतदार याद्यांमधून अनेक महिला मतदारांची म्हणजेच लाडक्या बहिणींची नावे कपात होण्याची शक्यता अजिबात नाकारता येणार नाही. याकरिता महिला मतदार अर्थातच लाडक्या बहिणी यापूर्वी कुठेही राहणाऱ्या असोत आजमीतिला त्या जिथे वास्तव्यास आहेत तिथेच त्यांच्या नावाची नोंद घेऊन तेथील मतदार याद्यांमध्ये त्यांचे नाव कोणतेही जाचक नियम व अटी न लावता समाविष्ट करून घ्यावेत. अशी मागणी मुक्त पत्रकार एस एम युसुफ यांनी पाठविलेल्या या निवेदनातून केली आहे.

---

## अंबाजोगाई हादरली! स्वाराती रुग्णालयात वकिलावर सुरक्षा रक्षकांचा प्राणघातक हल्ला!

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील स्वामी रामानंद तीर्थ (स्वाराती) वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आज दुपारी रक्ताचा थरार पाहायला मिळाला. रुग्णालयाच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या रक्षकांनीच कायदा हातात घेत ॲड. इस्माईल गवळी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यामुळे रुग्णालय परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला असून परिस्थिती हाताबाहेर जाण्याची चिन्हे दिसत आहेत. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, कोणत्यातरी कारणावरून ॲड. इस्माईल गवळी आणि सुरक्षा रक्षकांमध्ये बाचाबाची झाली. याचे पर्यावसान हाणामारीत झाले.



सुरक्षा रक्षकांनी अमानुषपणे केलेल्या या मारहाणीत ॲड. गवळी गंभीर जखमी झाल्याचे समजते. एका वकिलावर अशा प्रकारे भरदिवसा रुग्णालयात हल्ला झाल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. घटनेनंतर ॲड. गवळी यांचे समर्थक आणि नागरिकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली. सुरक्षा रक्षक की गुंड? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. रुग्णालय प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळेच अशा घटना घडत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सध्या रुग्णालय परिसरात प्रचंड घोषणाबाजी सुरू असून वातावरण स्फोटक बनले आहे. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिसांनी जमावाला पांगवण्याचा प्रयत्न केला असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. रुग्णांच्या सेवेसाठी असलेल्या या शासकीय रुग्णालयात वकिलालाच मारहाण झाल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणातील दोषी सुरक्षा रक्षकांवर कठोर कारवाई होणार का? आणि रुग्णालय प्रशासन यावर काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

संपादकीय

## सत्तांतर टिकवण्याचे राम शिंदे यांच्यापुढे आव्हान

सातारा जिल्हा परिषदेत भाजपने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला धक्का दिला. आता शिंदे यांच्या शिवसेनेने अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत नगरपंचायतीच्या सत्तास्पर्धेत भाजपला धक्का देण्याची तयारी केली आहे. त्यामुळे नाट्यमय राजकीय घडामोडी घडू लागल्या आहेत. विधान परिषदेचे सभापती, भाजप नेते राम शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांच्यावर मात करून त्यांच्याकडून कर्जत नगरपंचायतीची सत्ता हिसकावली खरी, मात्र ही सत्ता टिकवण्याचे आव्हान शिवसेनेने भाजप आणि पर्यायाने राम शिंदे यांच्यापुढे निर्माण केले आहे. नगराध्यक्षपदाच्या अविश्वास ठरावाच्या कायद्यात राज्यातील सरकारने बदल केला. या बदलाचा पहिला फायदा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी मिळवून कर्जत नगरपंचायतीत सत्तांतर घडवले. आता याच कायद्याने त्यांच्यापुढे सत्ता टिकवण्याचेही आव्हान निर्माण झाले आहे. हे या सर्व राजकीय नाट्यमय घडामोडीतील वेगळेपण आहे. आमदार रोहित पवार यांनी राष्ट्रवादी व काँग्रेसच्या १५ नगरसेवकांच्या माध्यमातून नगरपंचायतीची सत्ता मिळवली. भाजपला केवळ दोन जागा मिळाल्या. मात्र, १५ पैकी तब्बल ११ नगरसेवकांना भाजपमध्ये प्रवेश देऊन राम शिंदे यांनी सत्तांतर घडवले. हे सत्तांतराचे समीकरण अवघ्या वर्षभरातच ढासळताना दिसत आहे. दोन वर्षांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गाजावाजा करून भाजप प्रवेश करणारे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रवीण घुले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत शिवसेनेत प्रवेश केला, तर त्यांची भावजय नगराध्यक्ष रोहिणी घुले यांनी पदाचा राजीनामा देण्यास नकार देऊन राम शिंदे यांना चकवा दिला. या सर्वातून नव्या राजकीय समीकरणांची नांदी झाली आहे. ही समीकरणे आता राम शिंदे यांच्यासाठी डोकेदुखी ठरली आहेत. कर्जत-जामखेड मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला असताना रोहित पवार यांनी सलग दोन वेळा राम शिंदे यांचा पराभव केला. या पराभवाची राजकीय भरपाई करण्यासाठी राम शिंदे यांनी नगरपंचायतीत सत्तांतर घडवले. एकूण १७ नगरसेवकांपैकी राम शिंदे यांच्याकडे आता १०, रोहित पवारांकडे ४, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे ३ नगरसेवक आहेत. महिला नगराध्यक्षांच्या विरोधात अविश्वास ठरावासाठी १२ मतांची आवश्यकता आहे. राम शिंदे यांच्याकडे तेवढे संख्याबळ आता राहिलेले नाही. याच पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष रोहिणी घुले यांनी राजीनामा देण्यास नकार देऊन राम शिंदे यांच्यापुढे आव्हान निर्माण केल्याचे मानले जाते. यातून राजकीय गणित अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. आगामी काळात राम शिंदे रोहित पवार यांची मदत घेणार का, असाही एक उत्सुकतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मोठा गाजावाजा करून केलेले सत्तांतर टिकविण्याचे आव्हान राम शिंदे यांच्यापुढे निर्माण झालेले आहे. राम शिंदे त्यावर कशी मात करतात, की शिवसेनेतच राहून उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या मदतीने नगराध्यक्ष घुले पद अबाधित ठेवतात, याकडे लक्ष लागले आहे. ही समीकरणे आता राम शिंदे यांच्यासाठी डोकेदुखी ठरली आहेत. कर्जत-जामखेड मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला असताना रोहित पवार यांनी सलग दोन वेळा राम शिंदे यांचा पराभव केला. या पराभवाची राजकीय भरपाई करण्यासाठी राम शिंदे यांनी नगरपंचायतीत सत्तांतर घडवले. दोन वर्षांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गाजावाजा करून भाजप प्रवेश करणारे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रवीण घुले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत शिवसेनेत प्रवेश केला, तर त्यांची भावजय नगराध्यक्ष रोहिणी घुले यांनी पदाचा राजीनामा देण्यास नकार देऊन राम शिंदे यांना चकवा दिला. या सर्वातून नव्या राजकीय समीकरणांची नांदी झाली आहे.

# सरकारच्या संवेदनाहीन धोरणाच्या निषेधार्थ धनगर समाज रस्त्यावर! लिंबागणेश येथे रास्ता रोको

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

धनगर समाजाला एस.टी. प्रवर्गातील आरक्षणाची अंमलबजावणी करावी या प्रमुख मागणीसाठी धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बो-हाडे यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर दि.१६ मार्चपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या दहाव्या दिवशी त्यांचे सासरे रामराव होळकर यांनी जालना येथील राहत्या घरी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेनंतर धनगर समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून सरकारकडून केवळ आश्वासने देऊन वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप करण्यात आला. मंत्रीमंडळातील शिष्टमंडळाने भेट घेऊन चर्चा केली असली तरी ठोस निर्णय न घेतल्याने समाजात नाराजी वाढली आहे.



या पार्श्वभूमीवर सरकारच्या संवेदनाहीन धोरणाच्या निषेधार्थ मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२६ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनाची सुरुवात स्व. रामराव होळकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. सरकारच्या हलगर्जीपणामुळेच त्यांचा बळी गेला असल्याची तीव्र भावना व्यक्त करण्यात आली.

यावेळी डॉ. गणेश ढवळे, रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मोरे पाटील, बाळासाहेब मुळे, शहादेव धलपे, कृष्णा पितळे आदींची समयोचित भाषणे झाली. विद्यार्थी गणेश ढगारे यांनी मनोगत व्यक्त केले.वक्त्यांनी सरकारने कोर्ट-कचेरी व समित्यांच्या प्रक्रियेत न अडकता धनगर आणि धनगड हे एकच असल्याचा शासन निर्णय तातडीने घ्यावा, तसेच राज्यपालांच्या स्वाक्षरीसह शिफारस पत्र राष्ट्रपतींकडे पाठवून आरक्षणाचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी केली. निवेदन पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, विठ्ठल राठोड, गणेश परझने सहाय्यक फौजदार लिंबागणेश पोलिस चौकी, मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव,राजेभाऊ आप्पा गिरे, शंकर वाणी, भगवान मोरे, गणपत तागड, बंकट लगास, भगवान मोरे, रामदास मुळे, गोवर्धन गिरे, ईश्वंभर मुळे, रोहित तागड, प्रविण मुळे, अर्जुन गिरे, रामकिसन गिरे, सुमंत मुळे, बंकट लगास, संदीप मुळे, बाबासाहेब गिरे, सतिश गिरे, केशव गिरे, श्रीराम तागड, आबा राहिंज, सुरेश निर्मळ, तुकाराम गायकवाड, गोरख मुळे, संजय पावले, रमेश गायकवाड, बापुराव पितळे, बंडु ढगारे, अमोल पितळे, हनुमंत वैद्य, अंकुश गिरे, लहु गिरे, लिंबाजी गिरे, श्रीहरी निर्मळ, परशुराम गायकवाड, अशोक जाधव, श्रीधर मुळीक, शहादेव कोल्हे, आप्पा मुळे, कल्याण कोकाटे, श्याम गिरे, सर्जेराव मुळे, रामचंद्र मुळे आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## मावलाई श्री राज्यस्तरीय समाजसेवा पुरस्कार डॉ. गणेश ढवळेंना जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मावलाई युवक क्रीडा मंडळ व व्यायाम शाळा ब-हाणपुर यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १७ वर्षांपासून मावलाई देवी यात्रेनिमित्त पत्रकारिता, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना



मावलाई श्री राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यावर्षी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांना मावलाई श्री समाजसेवा पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील मूलभूत सुविधा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न, वृक्षारोपण व संवर्धन तसेच पर्यावरण संरक्षण यांसारख्या विविध सामाजिक विषयांवर सातत्याने अनोख्या आंदोलनांच्या माध्यमातून शासन दरबारी पाठपुरावा केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा ब-हाणपुर येथे दि. ०३ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे. यावेळी शशिकांत शिंगारे यांच्या हस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमास प्रमोद कुलकर्णी, दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, अविनाश वाघिरकर, धनंजय बजगुडे तसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड आर. एम. मोटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच पाडळशिंगी रितेश साबळे, मंडळ अध्यक्ष विष्णू यादव, सचिव भागवत वराट, पांडुरंग पवार, संतोष वराट यांनी केले आहे. दरम्यान, हा राज्यस्तरीय सन्मान जाहीर झाल्याबद्दल डॉ. गणेश ढवळे यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## पेट्रोलपंप चालक आणि वितरक कंपन्यांची संयुक्त बैठक
## तात्काळ वितरण सुरळीत करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात येणारा पेट्रोल डिजेलचा साठा हा पूर्वी इतकाच किंबहुना थोडा जास्तच आहे. असे असतांना पेट्रोल पंपावर रांगा दिसत आहेत. मागणी व पुरवठा यात वितरक कंपन्या आणि पेट्रोलपंप चालक यांच्या दरम्यान असलेल्या तक्रारींवर तातडीने तोडगा काढून वितरण सुरळीत करा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पेट्रोलियम वितरण कंपन्या व पेट्रोलपंप चालक यांना दिले. जिल्ह्यातील पेट्रोलपंपांवर वाहनधारकांच्या गेल्या दोन दिवसांपासून रांगा लागलेल्या दिसत आहेत. ही परिस्थिती निर्माण होण्यास कारणीभूत घटकांबाबत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पेट्रोलपंप चालक आणि वितरक कंपन्यांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक बोलावली होती.

बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, लेखाधिकारी पी.पी. होळकर, सहा. पुरवठा अधिकारी संदीप शिंदे, भारत पेट्रोलियमचे शशांक तिवारी, हिंदुस्थान पेट्रोलियमचे अजयकुमार सिन्हा, इंडियन ऑईलचे गणेश खेत्री तसेच पेट्रोलपंप चालक संघटनेचे अकील अब्बास, जिशान देशमुख, गणेश दरख, राजेंद्र सलुजा, नवजिंदरसिंग आदी प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, अफवा पसरवणाऱ्यांवर पोलीस विभागामार्फत तपास करुन कारवाई होईलच. मात्र पुरेसा इंधन साठा असतांना पेट्रोलपंपावर रांगा का लागत आहेत? याबाबत वितरक कंपन्या आणि पेट्रोलपंप चालक यांनी आपापसात समन्वय साधून परिस्थिती हाताळावी व वितरण सुरळीत करावे.

जिल्हाधिकारी म्हणाले की, लोकांना आपल्याकडील साठ्याची माहिती द्या. लोकांना इंधन उपलब्ध करुन द्या. आजच जिल्हा प्रशासनाने दुचाकी वाहनांना २०० रुपयांचे पेट्रोल व चारचाकी वाहनांना २००० रुपयांचे इंधन असे जे बंधन घातले होते ते ही हटवले आहे. त्यामुळे वितरणाचा कोणताही अडथळा वा निर्बंध नाही. इंधन वितरण डेपो ते पंप या दरम्यान होणाऱ्या वाहतुकीचा कालावधी कमीत कमी करुन इंधन उपलब्ध करा. पेट्रोलपंपांवर कायदा सुव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासंदर्भात पोलिसांना सुचना देण्यात आली आहे. मात्र नागरिकांनी संयम ठेवावा. अफवांवर विश्वास ठेवू नये. नेहमीप्रमाणे पेट्रोल डिजेल आपल्या वाहनात भरा. उगाचच जादा साठा करु नका, असे आवाहनही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले. ग्रामिण भागात विशेषतः शेतीच्या कामांना लागणाऱ्या डिजेलचीही उपलब्धता करुन देण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आल्याचेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी स्पष्ट केले.

**इंधन पुरवठा मर्यादीत करण्याचे आदेश रद्द**

पेट्रोलपंपांवरील वाहनधारकांची अचानक गर्दी वाढल्याने जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन पेट्रोल डिजेल मर्यादीत करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. तथापि, डिजेल व पेट्रोलचा पुरेसा साठा असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर इंधन निर्बंधाच्या आदेशाची आवश्यकता नसल्याने आधीचे आदेश रद्द करण्यात येत असल्याचे आदेश आज पुरवठा विभागाने जारी केले.

## महाराष्ट्र केसरी मध्ये सुमितकुमार विजेता : जुनिअर महाराष्ट्र केसरीचा बीडला मान



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेलापुरी या पुनर्वसित गावातील ऊसतोड कामगाराचा मुलगा पै. सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर याने महाराष्ट्र केसरी स्पर्धेत ७० किलो वजन गटात गादी विभागात सुवर्ण कामगिरी करत सुवर्ण पदक पटकावत महाराष्ट्र केसरी ७० किलो वजन गटात विजेता ठरला. महाराष्ट्र केसरी अधिवेशन वाघोली, पुणे मुक्कामी १८ ते २२ मार्च २०२६ या दरम्यान पार पडले. यावेळी पै. सुमितकुमार भारस्कर यांनी पहिल्या ४ फेऱ्या १०-०० अश्या मोठ्या गुण फरकाने विजय मिळवत सेमी फायनल मध्ये पुणे शहरचा विपुल थोरात सोबत ०८-०५ अशी लढत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत कोल्हापूर शहरातील सत्तपा हिरगुडे सोबत सुमितकुमारने ०६-०० अश्या मोठ्या गुण फरकाने विजय मिळवून सुवर्ण पदक पटकावले. पै. सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर हा पुण्यातील मारुंजी येथे अमोल बुचडे कुस्ती अकादमीमध्ये कुस्तीचे प्रशिक्षण घेत आहे. त्याला रुस्तम-ए-हिंद, महाराष्ट्र केसरी पै. अमोल भाऊ बुचडे, नरेंद्र कुमार कोच, घुले सर, पै. समीर देसाई, गुंड सर, कांबळे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.तसेच या अभूतपूर्व येशामुळे माजलगाव सह बीड जिल्ह्याचा दबदबा महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अधोरेखित झाला असून, पै. सुमितकुमार भारस्कर याचे विविध सामाजिक माध्यमातून तसेच सर्व स्तरावरून शुभेच्छाचा वर्षावासह अभिनंदन होत आहे.

## जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मजुराचा मुलगा झाला 'रेल्वे

**चिंचगव्हाणच्या सुशील चंदनशिवचे भारतीय रेल्वेत मोठे यश; गावच्या शिरपेचात मानाचा तुरा**

**माजलगाव । प्रतिनिधी**

कष्ट करण्याची तयारी आणि मनात जिद्द असेल तर परिस्थितीवर मात करून यशाचे शिखर गाठता येते, हे माजलगाव तालुक्यातील चिंचगव्हाण येथील रहिवाशी असलेले सुशील सुभाषराव चंदनशिव याने सिद्ध करून दाखवले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सुशीलची भारतीय रेल्वेमध्ये असिस्टंट लोको पायलट (-ङझ) पदी निवड झाली असून, त्याच्या या यशाने संपूर्ण जिल्ह्यातून - कौतुकाचा वर्षाव होत आहे.



संघर्षातून इंजिनिअरिंगचा प्रवास सुशीलचे वडील सुभाषराव चंदनशिव हे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घरात अत्यंत बेताची परिस्थिती असतानाही त्यांनी सुशीलच्या शिक्षणात कोणतीही कमतरता भासू दिली नाही. सुशीलने देखील वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत आपले इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. अशी होती परीक्षेची वाटचाल सुशीलने २०२४ मध्ये रेल्वे भरतीची परीक्षा दिली होती. ही परीक्षा अत्यंत कठीण टप्प्यातून पार पडली. पूर्व परीक्षा (उइढ-१): यामध्ये त्याने घवघवीत यश मिळवले. मुख्य परीक्षा (उइढ-२): तांत्रिक विषयांच्या या परीक्षेतही त्याने आपली चमक दाखवली. बौद्धिक चाचणी शेवटच्या आणि अत्यंत महत्त्वाच्या अशा सायको टेस्टमध्ये यशस्वी होऊन त्याने आपले नाव अंतिम यादीत कोरले.

आई-वडिलांच्या कष्टाचे चीज सुशीलच्या या यशामागे त्याच्या आई-वडिलांचा मोलाचा वाटा आहे. आपल्या मुलाने शिकावे आणि मोठे व्हावे यासाठी वडिलांनी मजुरी करून त्याला पाठबळ दिले, तर आईने त्याला सदैव प्रोत्साहन दिले. आज माझ्या मुलाने माझ्या कष्टाचे चीज केले, अशी भावना व्यक्त करताना सुशीलच्या वडिलांचे डोळे पाणावले होते. सुशीलच्या या निवडीमुळे चिंचगव्हाण गावात आनंदाचे वातावरण असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर त्याने एक नवीन आदर्श उभा केला आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन केले जात आहे.

## वाहनांचे 'काळे' साम्राज्य आणि प्रशासनाचा 'पांढरा' चष्मा!

**माजलगाव । प्रतिनिधी**

गोदावरीच्या पात्रातून सोन्यासारखी वाळू उपसून आपले खिसे गरम करणाऱ्या वाळू माफियांनी सध्या माजलगाव तालुक्यातील हिवरा आणि मंजरथ परिसरात उच्छाद मांडला आहे. दिवसाढवळ्या आणि रात्रीच्या अंधारात कोणतीही भीती न बाळगता विना नंबरची वाहने सुसाट धावत असून, याकडे माजलगावचे तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचे चित्र दिसत आहे. प्रशासनाने नेमका कोणता चष्मा घातला आहे? असा संतप्त सवाल आता हिवरा आणि मंजरथ येथील त्रस्त नागरिक विचारत आहेत.

हिवरा आणि मंजरथ या दोन्ही गावांच्या शिवारातून वाळूची अवैध वाहतूक करण्यासाठी वापरली जाणारी बहुतांश वाहने, विशेषतः ट्रॅक्टर आणि हायवा, कोणत्याही नोंदणी क्रमांकाशिवाय धावत आहेत. ही वाहने एवढ्या वेगाने चालवली जातात की, रस्त्यावरून चालणाऱ्या सामान्य नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. नंबर प्लेट नसल्यामुळे अपघातासारखी घटना घडल्यास कोणाला जबाबदार धरायचे, हा मोठा प्रश्न आहे. ही विना नंबरची वाहने जणू कायद्याला आव्हान देत प्रशासनाच्या नाकाखालून वाळू चोरून नेत आहेत. मंजरथ परिसरातही परिस्थिती हिवरा गावासारखीच गंभीर आहे. येथेही गोदावरी पात्राची अक्षरशः चाळण करण्यात आली आहे. रात्रंदिवस वाळू उपसा सुरू असल्यामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर परिणाम झाला असून पर्यावरणाचा मोठा -हास होत आहे. मंजरथ येथील



रस्त्यांवरून जेव्हा ही वाळूची वाहने जातात, तेव्हा धुळीचे लोट आणि आवाजाच्या प्रदूषणामुळे ग्रामस्थ हैराण झाले आहेत.

**रस्त्यांचे झाले 'तीनतेरा'**

या बेसुमार वाळू वाहतुकीचा सर्वात मोठा फटका सार्वजनिक मालमत्तेला, म्हणजेच रस्त्यांना बसला आहे. हिवरा आणि मंजरथ भागातील रस्ते या जड वाहनांच्या ओझ्याखाली दबले असून, जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत. एकेकाळी सुस्थितीत असलेले रस्ते आता केवळ नावापुरते उरले आहेत. रस्त्यांची ही दुर्दशा पाहून वाळू माफिया मालामाल आणि जनता रस्त्यांच्या खड्ड्यात अशी स्थिती निर्माण झाली आहे. रस्ते खराब झाल्यामुळे शेतीमाल बाजारात नेणे किंवा आपत्कालीन स्थितीत दवाखान्यात जाणेही कठीण झाले आहे.

**कुंभकर्णी झोपेत असलेले महसूल प्रशासन**

सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे, या संपूर्ण प्रकाराची माहिती असूनही माजलगावचे तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी कोणतीही ठोस कारवाई करताना दिसत नाहीत. वाळू माफियांच्या विरोधात केवळ कागदोपत्री दंड आकारून किंवा एखादे वाहन पकडून प्रशासकीय 'सोपस्कार' पूर्ण केले जात आहेत. परंतु, मुळाशी जाऊन हा अवैध उपसा थांबवण्याची जिद्द प्रशासनात दिसत नाही. अधिकाऱ्यांच्या या भूमिकेमुळे वाळू माफियांचे धाडस अधिकच वाढले असून, त्यांना कोणाचा तरी वरदहस्त असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

**प्रशासनाला जनतेचे सवाल**

विना नंबरची वाहने रस्त्यावर धावतात कशी? परिवहन विभाग आणि महसूल प्रशासन गप्प का? गोदावरी पात्रातील अवैध उपसा रोखण्यासाठी रात्रगस्त का घातली जात नाही? रस्त्यांच्या झालेल्या दुरवस्थेला जबाबदार असणाऱ्या माफियांकडून दंड वसूल करून रस्ते दुरुस्त का केले जात नाहीत? हिवरा आणि मंजरथ येथील नागरिकांनी आता प्रशासकीय दिरंगाईविरोधात आक्रमक पवित्रा घेण्याची तयारी दर्शवली आहे. जर तातडीने या वाळू माफियांच्या मुसक्या आवळल्या नाहीत, तर तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. आता चेंडू जिल्हा प्रशासनाच्या दरबारात असून, वरिष्ठ अधिकारी यावर काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## धम्मदीप बुद्ध विहार येथे प्रियदर्शी सम्राट अशोक जयंती उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

युद्धात निपुण असलेल्या प्रियदर्शी सम्राट अशोकाने तलवारीच्या जोरावर जवळपास चक्रवर्ती सम्राट पद मिळवले होते. परंतु कलिंगा युद्धातील नरसंहार बघून त्यांनी तलवारीचा त्याग करून तथागतांच्या प्रज्ञा, शिल, करुणा मैत्री, समता, शांती व मानवाच्या कल्याणाचा पंचशील व अत:दीप भव आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला शरण जाऊन व तसे आचरण करून जगात लोककल्याणकारी सम्राट म्हणून कार्य केले. त्यांचा आदर्श समोर ठेवून जगाला युद्ध नको, तर बुद्ध विचारांची गरज आहे असे प्रतिपादन प्राध्यापक डॉ.नामदेव शिनगारे यांनी केले. महामानव अभिवादन ग्रुप व धम्मदीप बुद्ध विहार बलभीम नगर पालवण रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंतीदिनी अभिवादन कार्यक्रमाच्याप्रसंगी अध्यक्षपदी प्रा. डॉ. नामदेव शिनगारे लाभले होते तर प्रमुख पाहुणे



म्हणून से.नि. शिक्षण अधिकारी सखाराम उजगरे, प्राध्यापक डॉ. शिवाजीराव दिवाण, से.नी उपनिबंधक सहकार ड हनुमंत कांबळे मुख्याध्यापक वैशाली शिंदे, बौद्धाचार्य ड भास्करराव सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. विचार मंचावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी. एम भोले, वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी. जी वानखेडे यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्प तर सम्राट अशोक छत्रपती, शिवाजी महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पदीप धुपाने पूजन मान्यवरांच्या हस्ते करून विनम्र अभिवादन करण्यात आले व सामुदायिक त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले कार्यक्रमाचे अवचित्य साधून सुप्रसिद्ध लेखिका, कवियत्री यांना नुकताच नालंदा फाऊंडेशन पुणे तर्फे राज्यस्तरीय कर्तुत्व गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. तसेच बौद्धाचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल ॲड.भास्कर सोनवणे यांचा देखील महामानव अभिवादन ग्रुप व धम्मदीप बुद्ध विहारा तर्फे पुष्पगुच्छ व धम्मपद हा ग्रंथ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना माया दिवाण म्हणाल्या की, सर्वच आदर्श महापुरुषांची जीवन चरित्रांचा सखोल अभ्यास करून त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जीवन जगल्यास आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो व पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करून ज्येष्ठांच्या कडून पाठीवरील कौतुकाची थाप पुढील कार्य करण्यास बळ देते व तथागतांच्या अंधारातून प्रकाशाकडे - प्रकाशाकडून अतिउच्च प्रकाशाकडे जाण्यास मदत होते असे भावोद्गार काढले. स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार करून स्वतः सम्राट अशोकाने तथागताने सांगितलेल्या मानवाच्या कल्याणाच्या मार्गाचा प्रसार व प्रचार करण्याकरिता आपला पुत्र महेंद्र व कन्या संघमित्रा ला सिलोन (श्रीलंका)ला पाठवले हा सम्राट अशोकांचा त्याग सर्वांसाठी आदर्शवत आहे.

कार्यक्रम प्रसंगी आयु. ॲड. हनुमंत कांबळे यांनी देखील सम्राट अशोकांच्या दैदिप्यमान जीवन पटावर सखोल प्रकाश टाकून सम्राट अशोकाचे कार्य सर्वांसमोर ठेवणे आजच्या काळात कसे गरजेचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे उपस्थितांना समजावून सांगून विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जी.एम. भोले यांनी केले तर आभार प्रदर्शन ॲड. तेजस वडमारे यांनी केले. कार्यक्रमास अंजली वडमारे, सरिता खेमाडे, अर्चना जाधव, आशाबाई भालेराव, क्रांती धनवे, मालणबाई अंकुटे रमाबाई सोनवणे, पी.वाय. घोडेराव, बि.डी तांगडे, बी.जी दळवी, सुनील समुद्रे, दिलीप गवळी, व महामानव अभिवादन ग्रुपचे बहुसंख्य सदस्य व धम्मदीप महिला मंडळाच्या बहुसंख्य महिलांची उपस्थिती होती. सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ॲड.इस्माईल गवळी व शेख रमीज यांच्यावर दाखल केलेला ३५३ चा खोटा गुन्हा रद्द करा

## मागणीसाठी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला लोकविकास महाआघाडी व सर्वपक्षीय मोर्चा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय ग्रामीण रूग्णालय व महाविद्यालय, अंबाजोगाई येथील एम.एस.एफ सुरक्षा रक्षकांवर कारवाई करून ॲड.इस्माईल गवळी व शेख रमीज यांच्यावर दाखल केलेला ३५३ चा खोटा गुन्हा रद्द करावा अशी मागणी लोकविकास महाआघाडी आणि सर्वपक्षीय नेते व प्रमुख कार्यकर्ते यांनी अपर पोलीस अधिक्षक, अपर जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांना शुक्रवारी निषेध मोर्चा काढून दिलेल्या निवेदनातून केली आहे. ॲड.इस्माईल गवळींसाठी सर्वपक्षीय नेते एकवटल्याचे दिसून आले. यावेळी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला.

खोटे दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत, या मागणीसाठी शुक्रवार, दिनांक २७ मार्च रोजी सदर बाजार चौकातून निघून हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चात मोठ्या संख्येने सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते सहभागी झाले होते. खोटे गुन्हे मागे घ्या, दवाखाना वाचवा अशा घोषणा देत आंदोलकांनी प्रशासनाचा निषेध नोंदवला. यावेळी लोकविकास महाआघाडी, अंबाजोगाई आणि सर्वपक्षीय नेते व प्रमुख कार्यकर्ते यांच्या वतीने अपर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, अपर जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय ग्रामीण रूग्णालयातील सुरक्षा रक्षक एका रिक्षा चालकास मारत असताना अंबाजोगाई शहरातील विधी तज्ज्ञ तथा राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष ॲड.इस्माईल गवळी हे त्या ठिकाणी सोडवायला गेले असता त्यांना १५ सुरक्षा रक्षकांनी रिंगण करून बेदम मारहाण केली. त्याचबरोबर सोडवायला गेलेल्या रमीज सर व या मारहाणीचा




व्हिडिओ काढणारे पवार यांनाही सुरक्षा रक्षकांनी बेदम मारहाण केली.

सदरील मारहाण प्रकरणात ॲड.इस्माईल गवळी यांना सुरक्षा रक्षकाकडून गंभीर इजा पोचली आहे. असे असताना ही उलट ज्यांना मारहाण झाली त्या ॲड.इस्माईल गवळी व शेख रमीज यांच्यावरच ३५३ चा गुन्हा दाखल केला आहे. याचा आम्ही लोकविकास महाआघाडीच्या वतीने तीव्र शब्दांत जाहीर निषेध करीत आहोत. व सोबतच या घटनेच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे मागणी करीत आहोत की, १) ॲड.इस्माईल गवळी, रमीज सर व या मारहाणीचा व्हिडिओ काढणारे पवार यांना अमानुष मारहाण करणाऱ्या १५ सुरक्षा रक्षकांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करावे., २) ॲड.गवळी व शेख रमीज यांची कोणतीही चूक नसताना उलट त्यांच्यावर दाखल केलेला ३५३ चा खोटा गुन्हा तात्काळ रद्द करावा., ३) स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय रूग्णालय व महाविद्यालयाचे आधिष्ठाता यांची तात्काळ बदली करावी. सदरील गंभीर प्रकरणाची दखल घेत वरील मागण्या मान्य करीत तातडीने कारवाई न झाल्यास सर्वपक्षीय तीव्र आंदोलन करण्यात येईल. याची आपण नोंद घ्यावी असा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

सदरील निवेदनाच्या प्रति १) अपर जिल्हाधिकारी, २) अपर पोलीस अधिक्षक आणि ३) उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना देण्यात आल्या आहेत.

निवेदन देताना निवेदक राजकिशोर मोदी (नेते - लोकविकास महाआघाडी.), पृथ्वीराज साठे (माजी आमदार, केज विधानसभा, मतदार संघ.), दिनेश भराडीया (उपनगराध्यक्ष, नगरपरिषद, अंबाजोगाई.), सय्यद ताहेरभाई (गटनेता - लोकविकास महाआघाडी, नगरपरिषद, अंबाजोगाई.), हाजी इस्माईल गवळी (ज्येष्ठ नगरसेवक), सुनिल जगताप (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), महेंद्र निकाळजे (रिपाइं-आठवले गट), भिमराव सरवदे (बीड जिल्हा कार्याध्यक्ष, भिमशक्ती), राजेश वाहुळे (मराठवाडा युवा अध्यक्ष, लोकजनशक्ती पार्टी-रामविलास), अशोक पालके (संस्थापक अध्यक्ष, युवा आंदोलन) तसेच नगरसेवक मालू जोगदंड, आकाश कराड, नजीर उमरदराजखान पठाण, बशीरा शफीक सय्यद, शेख शिरीन अशफाक आणि सौ.सोनीताई दत्तात्रय सरवदे यांच्या स्वाक्षर्‍या आहेत. तर मोर्चात मारूफ बाबा, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, शिवसेनेचे मदनलाल परदेशी, शेख रमीज सर, शेख मुक्तार, कल्याण भिसे, सचिन जोगदंड, मोईन शेख, रौफ बिल्डर, सचिन जाधव, दत्ताभाऊ सरवदे, सुनील वाघाळकर, समाजवादी पार्टीचे जिलानी, जावेद गवळी, हमीद चौधरी, ॲड.शारेख अली उस्मानी, धीमंत राष्ट्रपाल, महेबूब गवळी हे सहभागी झाले होते.

## बीडचे भूमिपुत्र प्रमोद क्षीरसागर यांची पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे (एलसीबी) शाखेच्या पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पेठ बीड भागातील रहिवाशी असलेले प्रमोद क्षीरसागर यांची पुणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. दिनांक २६ मार्च रोजी त्यांनी अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीने बीड जिल्ह्याची मान स्वाभिमानाने उंचावली असून पेठ बीड भागातील व बीड शहरातील मित्रपरिवार व नातेवाईकांनी प्रमोद क्षीरसागर यांचे अभिनंदन केले असून प्रसिद्ध सीताई कन्स्ट्रक्शनचे संचालक श्याम क्षीरसागर, पप्पू क्षीरसागर तसेच रणजीत क्षीरसागर यांचे ते बंधू आहेत.



पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पोलीस निरीक्षक पदी बीडचे भूमिपुत्र प्रमोद क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी प्रमोद क्षीरसागर यांनी नवी मुंबई येथील पनवेल पोलीस स्टेशन पुणे पिंपरी चिंचवड भागातील हिंजवडी, वाकड, चतुर्शिंगी, तळेगाव दाभाडे ,चाकण, आळेफाटा, शिक्रापूर या पोलीस स्टेशनला अतिशय उत्कृष्ट काम केलेलं असून विविध आव्हानात्मक व किचकट गुन्ह्यांतील आरोपीचा शोध लावलेला आहे. पुणे परिसरात दांडगा जनसंपर्क व गरजवंतांना आवश्यक ती मदत करण्यासाठी ते प्रसिद्ध आहेत.

पुणे जिल्ह्याची गुन्हेगारी रोखण्याची पूर्ण जबाबदारी प्रमोद क्षीरसागर यांच्या खांद्यावर आली आहे, अत्यंत मनमिळाऊ व पोलीस तसेच जनता यांचे संबंध दृढ करण्यासाठी प्रमोद क्षीरसागर नेहमीच प्रयत्नशील असतात, गुन्हेगारावर वचक निर्माण करत अत्यंत किचकट गुन्ह्यांचा तपास त्यांनी पूर्ण केलेला आहे. प्रमोद क्षीरसागर यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली असून त्यांचा प्रदीर्घ अनुभव व गुन्हेगारावर असणारा वाचक पाहता पुणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पोलीस निरीक्षक प्रमुख पदाची जबाबदारी ते यशस्वीरित्या पार पाडणार असा ठाम विश्वास पुणे ग्रामीण भागातील नागरिकांच्या वतीने व्यक्त केला जात आहे. बीड शहरातील भूमिपुत्र असलेले प्रमोद क्षीरसागर यांच्या निवडीने बीड जिल्ह्याची मान उंचावली आहे.

## सरकारला गॅस बंद करून स्टो चालू करायचे आहे का ? : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्र सरकारला गॅस बंद करून स्टोर चालू करायचे आहे का ? बीड जिल्ह्यासाठी १.२० लाख लिटर रॉकेल मंजूर करण्यात आलेले आहे. हा साठा जिल्ह्यातील १९७७ स्वस्त धान्य दुकानामार्फत वाटप करण्यात येणार आहे. प्रत्येकी तीन लिटर देण्यात येईल. बंद केलेले रॉकेल परत का आणले जात आहे. त्याच्यामागे सरकारचा काय हेतू आहे. परत एकदा जनतेने स्ट्रो चालू करावयाचे का ? स्टोरच्या भडक्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झालेले आहे. याच रॉकेलमुळे बरेच महिलांनी अंगावर टाकून आत्महत्या केलेली आहे. रॉकेल मुळे परत एकदा लाईट बंद करून घरोघरी दिवे पेटवायचे आहे का ? पेट्रोल डिझेल मध्ये मिक्स करायसाठी तर आणले जात नाही ना ? हा जनतेच्या मनात पडलेला प्रश्न आहे.

## पाटोदा येथील गायरान जमिनीवरील अतिक्रमण हटवण्यासाठी ३० मार्चला मोजणी होणार

**पाटोदा । प्रतिनीधी**

पाटोदा शहरातील गट क्रमांक ७१५ या शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. या आदेशानुसार, सदर जमिनीवरील अतिक्रमण सहा महिन्यांच्या आत निष्कासित करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रक्रियेचा भाग म्हणून ३० मार्च २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता या क्षेत्राची शासकीय मोजणी निश्चित करण्यात आली आहे. या बाबत संबंधितांना तहसीलदार आणि भूमी अभिलेख कार्यालयाने नोटीस बजावली आहे.

**न्यायालयाचा निर्णय**

या अतिक्रमण प्रकरणी छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात ॲड. एन.एल. जाधव यांच्यामार्फत शेख मोबीन हमीद व रियाज युसूफ सय्यद यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर (पी.आय.एल.क्र. २७/२०२५) सुनावणी करताना न्यायालयाने १४ ऑक्टोबर २०२५ रोजी हे आदेश दिले होते. जिल्हाधिकारी बीड आणि उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्या पत्रांनुसार, आता प्रत्यक्ष कारवाईला वेग आला आहे.

**संबंधित विभागांना नोटीस**

तहसीलदार कार्यालय आणि भूमी अभिलेख कार्यालयामार्फत या जमिनीशी संबंधित सर्व संस्था आणि व्यक्तींना नोटीस बजावण्यात आली आहे. या मध्ये नगरपंचायत पाटोदा आणि पोलीस निरीक्षक. मुस्लीम समाज कब्रस्थान (दर्गा हजरत राजमहमद), सुंदर सहकारी बिजोत्पादक संस्था, बप्पासाहेब बाबासाहेब जाधव, एस टी महामंडळ बसस्थानक व्यवस्थापक, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि दुय्यम निबंधक कार्यालय यांचा सॅमावेश आहे.

**मोजणीवेळी उपस्थित राहण्याचे आवाहन**

मोजणीच्या दिवशी सर्व संबंधित धारकांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी घटनास्थळी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. जर कोणी अनुपस्थित राहिले, तर त्यांच्या गैरहजेरीत मोजणी पूर्ण केली जाईल आणि त्यानंतर कोणताही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, असे भूमी अभिलेख कार्यालयाने स्पष्ट केले आहे. मोजणीसाठी महसूल विभागाचे कर्मचारी आणि पोलीस बंदोबस्त तैनात राहण्याची शक्यता आहे, जेणेकरून न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी विनाअडथळा पार पडेल.

## सी एस आर मार्फत अंगणवाडी क्रमांक १०३ व कोड ५०९ यांना साहित्य वाटप

**बीड । प्रतिनिधी**

दि.२५ रोजी वॉर्ड क्रमांक २३ मधील अंगणवाडी क्रमांक १०३ ला लहान मुलांचे साहित्य किट वाटप करण्यात आले यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून वॉर्ड क्र २३ चे नगरसेवक व गटनेते खुर्शीद आलम साहेब. मुख्य सेविका. सी. बी. जाधव मॅडम. अंगणवाडी सेविका श्री. लोकरे मॅडम दैनिक किसानचे. उपसंपादक. शेख अयास भाई अंगणवाडी. मदतनीस. श्री. बोबडे मॅडम आणि सर्व अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या. यावेळी येणाऱ्या काळात आपण अंगणवाडी ला स्वतःची जागा उपलब्ध करून देण्यासाठी आणि नगर परिषदे मार्फत जे सहकार्य लागेल ते करण्यासाठी प्रयत्न करू असे नगरसेवक. तथा गटनेते खुर्शीद आलम साहेब यांनी म्हटले आहे.

आणि जे चांगले काम करतात त्यांना आम्ही असेच प्रत्येक वेळी सहकार्य करू असे मुख्य सेविका सीबी जाधव मॅडम यांनी म्हटले आहे. पूर्ण बीड शहरातून प्रथम क्रमांक पटकावत अंगणवाडी क्रमांक १०३.च्या सेविका श्रीमती. लोकरे मॅडम. यांनी हे साहित्य आपल्या अंगणवाडी ला खेचून आणल्या बद्दल परिसरातील नागरिकांनी लोकरे मॅडम यांचे अभिनंदन केले.

## बीड जिल्ह्यामध्ये इंधन साठा पर्याप्त स्वरुपामध्ये असल्यामुळे नागरीकांनी इंधनासाठी पेट्रोल पंपावर गर्दी करणे टाळावे

**बीड । प्रतिनिधी**

सध्यस्थितीमध्ये आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या तणावपुर्ण पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात व बीड शहरात इंधन तुटवडा निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये कार्यरत सर्वसाधारणपणे सर्वच पेट्रोल पंपावर अतिरीक्त स्वरुपामध्ये वाहनांमध्ये इंधन साठा करणेसाठी गर्दी होऊन पेट्रोल पंपावर वाहनांची गर्दी झालेली आहे. या संदर्भात सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, बीड जिल्ह्यामध्ये पेट्रोल व डिझेलचा साठा सद्यस्थितीमध्ये पर्याप्त प्रमाणामध्ये उपलब्ध असून इंधन पुरवठा सुरळीत सुरू आहे.

काही पेट्रोल पंप चालकांनी त्यांना पेट्रोल व डिझेल प्राप्त होणाऱ्या पेट्रोलियम कंपन्यांना देयके उशिराने अदा केली त्यामुळे त्यांना इंधन साठा थोडा उशिराने प्राप्त झाला. सर्वच पेट्रोल पंप कंपनीच्या विक्री अधिकारी / प्रतिनीधी यांना प्रशासनाच्या मार्फत इंधन पुरवठा सुरळीत ठेवणेकामी आवश्यक त्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.बीड जिल्ह्यामध्ये पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा असुन पुरवठा सुरळीत चालु आहे. कोणीही अफवांवर विश्वास ठेवून अनावश्यक साठा करू नये व पेट्रोल पंपावर अनावश्यक गर्दी टाळावी. चुकीच्या अफवा तसेच चुकीची माहिती पसरविणाऱ्यांवर योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात येईल. जिल्हा प्रशासन, तसेच ऑईल कंपन्या पेट्रोल व डिझेलचा साठा सुरळीत व कायम ठेवणेबाबत कटीबध्द आहे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## डॉ. पुनम भालेराव यांना एमएच वुमन एक्सिलेन्स २०२६ पुरस्कार प्रदान




**बीड । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त युनाय फाऊंडेशन कडून आयोजित पुरस्कार समारंभामध्ये डॉ. पुनम भालेराव यांना एमएच वुमन एक्सिलेन्स २०२६ पुरस्कार प्रदान करण्यात आला. बीड शहराच्या रहिवासी असलेल्या सुप्रसिद्ध सौंदर्यतज्ञ डॉ. पुनम भालेराव यांचे वैद्यकीय क्षेत्रासह सामाजिक कार्यात असलेले योगदान पाहून त्यांना पुण्यात पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातील कर्तृत्ववान महिलांचा महागौरव सोहळा पुणे येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सभागृह, बिबवेवाडी येथे दि.२१ मार्च २०२६ शनिवार रोजी दुपारी पार पडला. या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटन महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपायुक्त रुक्मिणीताई गलांडे आणि विमेन सेल पुणे मिरर च्या संचालिका शितल बियाणी होत्या. प्रमुख वक्त्या म्हणून ॲड. अदिती निटुरे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विमेन लीडरशीप प्रोग्राम च्या हेड गौरी निगुडकर होत्या. हा पुरस्कार वितरण सोहळा युनाय फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा मायाश्री गायकवाड यांनी आयोजित केला होता.

पुरस्कार प्राप्त डॉ. पूनम भालेराव या बीड शहरात स्किनोवेशन क्लिनिक च्या माध्यमातून एक सुप्रसिद्ध सौंदर्य तज्ञ म्हणून प्रसिद्ध होत्या. गेल्या वर्षी त्यांनी पुणे शहरात आपले हॉस्पिटल उघडले. तेथेही त्यांनी अल्पावधीतच एक निष्णात सौंदर्यतज्ञ म्हणून ख्याती मिळविली. शिवाय बीडच्या कन्या असल्याने बीड सोबत जुळलेली नाळ तुटू नये म्हणून महिन्यातून एकदा रुग्ण तपासणीसाठी बीडला येवून सेवा देतात. वैद्यकीय क्षेत्रात सेवा देत असतानाच सामाजिक क्षेत्रातही त्या नेहमी पुढाकार घेतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊनच त्यांना हा पुरस्कार मिळाल्याने त्यांचे बीड शहरातून मोठ्या प्रमाणात अभिनंदन होत असून पुढील कार्यास भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहे.

## जिल्हाधिकारी साहेब, अवकाळी पावसाने वाहून गेलेल्या पुलांची दुरुस्ती कधी?

### तत्कालीन पालकमंत्री अजितदादांनी मंजूर केलेल्या निधीचं काय झालं? लिंबागणेश ते बोरखेड पुलाच्या दुरुस्तीची मागणी : डॉ. ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील अनेक रस्ते, नळकांडी पुल, तलाव व बंधारे वाहून गेले होते. त्यावेळी तत्कालीन पालकमंत्री अजित पवार यांनी जिल्हा प्रशासनाला तातडीने दुरुस्तीचे आदेश देत आपत्ती व्यवस्थापनांतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केला होता. मात्र, या घटनेला सहा महिने उलटूनही अनेक ठिकाणी दुरुस्तीची कामे रखडलेली आहेत. जिल्हा प्रशासनाच्या दिरंगाईमुळे ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मंजूर निधीचा उपयोग नेमका कधी होणार? आणि प्रत्यक्ष कामांना सुरुवात कधी होणार? असा सवाल उपस्थित केला आहे.



**लिंबागणेश-बोरखेड रस्ता अद्यापही खचलेलाच**

बीड तालुक्यातील लिंबागणेश ते बोरखेड हा महत्त्वाचा रस्ता व पुल सप्टेंबरमधील पावसात वाहून गेला होता. या रस्त्यावरून वाणी वस्ती, घोलप वस्ती, गावडे वस्ती, ढवळे वस्ती, घरत वस्ती, मुळे वस्ती येथील नागरिकांचा दैनंदिन संपर्क आहे. भाजीपाला, दुग्ध व्यवसाय तसेच विद्यार्थ्यांच्या ये-जा यावर याचा मोठा परिणाम होत आहे.

दि.३० सप्टेंबर रोजी डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली तत्कालीन पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा वार्षिक योजना (लेखाशिर्ष ३०५४-३१२१ - ग्रामीण रस्ते विकास योजना) अंतर्गत सन २०२५-२६ साठी २० लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता.

कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्र.१, जिल्हा परिषद बीड यांनी निविदा प्रक्रिया सुरू असल्याचे लेखी कळवले होते. मात्र, आजतागायत प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. दरम्यान, रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच खराब होत असून आगामी पावसाळ्यापूर्वी तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अन्यथा नागरिकांना पुन्हा मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## बीड जिल्हा बामुक्टा संघटनेच्या उपाध्यक्षपदी डॉ. विलास भिलारे यांची बिनविरोध निवड

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ टीचर्स असोसिएशन (बामुक्टा) संघटनेच्या बीड, जिल्हा कार्यकारिणीची निवड बीड येथील बलभीम महाविद्यालयात दि.२५.३.२०२६ रोजी दुपारी पाच वाजता विभागीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली असून यामध्ये सर्वानुमते बीड जिल्ह्याची कार्यकारणी निवड करण्यात आली. यामध्ये जिल्हा उपाध्यक्ष म्हणून चौसाळा येथील कला व विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. विलास भिलारे यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.



केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. बाबासाहेब कोकाटे आणि विभागीय उपाध्यक्ष डॉ. रमेश लक्ष्मणराव वारे यांच्या नियोजनात आणि ज्येष्ठ मार्गदर्शक खालील मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. फुलचंद सलामपुरे, डॉ. राजेश करपे, डॉ. अंकुश कदम व्यवस्थापन परिषद सदस्य छत्रपती संभाजी नगर, डॉ. विलास खंदारे, प्राचार्य डॉ. संतोश उंदरे, डॉ. मुंजा भाऊ धोंडगे, डॉ. आप्पासाहेब हुंबे, डॉ. सुनील कुमार वनंजे, डॉ. गफाट, डॉ. सरकटे, माजी प्राचार्य डॉ. हनीफ, प्राचार्य तथा सिनेट सदस्य डॉ विश्वास कंधारे, प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे, प्राचार्य प्रसाद मदन, डॉ. संजय कदम, प्रा.समाधान माने सिनेट सदस्य बंडू सोमवंशी इत्यादी प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये ज्येष्ठ नेते डॉ. फुलचंद सलामपुरे यांनी खालील प्रमाणे जिला कार्यकारिणीची निवड जाहीर केली. अध्यक्ष डॉ. प्राचार्य अर्जुन मोरे वसुंधरा महाविद्यालय घाटनांदुर अंबाजोगाई, उपाध्यक्ष डॉ. विलास भिलारे चौसाळा, डॉ. राजकुमार थोरवे आष्टी, डॉ. ज्ञानेश्वर शिंदे माजलगाव, कोषाध्यक्ष डॉ. संजय सुरवसे बीड, सचिव डॉ. शंकरराव वाघमारे नेकनूर, सहसचिव सुनील जाधव, डॉ. हरिभाऊ कदम शिरसाळा, डॉ. सतीश कदम, महिला प्रतिनिधी डॉ. सुचिता खामकर, डॉ. रफिक शेख, डॉ. राजकुमार चाटे, डॉ. सखाराम पांढरे, डॉ. रमेश माने, डॉ. गजानन दराडे डॉ. ज्ञानेश्वर येवले, डॉ. इंगोले, डॉक्टर अशोक होके, डॉ. सचिन खिस्ते, डॉ. पठाण गेवराई इत्यादी मान्यवरांचा जिल्हा कार्यकारणी समावेश झाला असून नवीन कार्यकारिणीच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी गेवराई, माजलगाव, परळी, केज धारूर बीड, पाटोदा, शिरूर, केज, येथील अनेक प्राध्यापक व संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यशोधरा बुद्ध विहारात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना; विविध कार्यक्रमांचे आयोजन

### काल.राधाबाई वाघमारे यांची संकल्पपूर्ती व काल.भिकाजीराव वाघमारे यांच्या पावन स्मरणार्थ भिम प्रतीरुपाच दान

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील फुले नगर भागातील यशोधरा बुद्ध विहार येथे शुक्रवार, दि.३ एप्रिल २०२६ रोजी भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य मूर्तीचा प्रतिष्ठापना सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न होणार आहे. हा सोहळा कालकथित राधाबाई भिकाजीराव वाघमारे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आणि कालकथित भिकाजीराव किसन वाघमारे (माजी जि.प. सदस्य, बीड) यांच्या पावन स्मरणातून आयोजित करण्यात आला आहे.



मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त दिवसभरात तीन सत्रांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथम सत्र (सकाळी ९:३० वा.): पूजनीय भिक्खू संघाच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात येईल. द्वितीय सत्र (सकाळी १०:३० वा.): डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येईल. ही मिरवणूक यशोधरा बुद्ध विहार (फुले नगर) पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा विहार येथे येईल. तृतीय सत्र (दुपारी १२:०० वा.): पूजनीय भिक्खू संघ आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची रीतसर प्रतिष्ठापना केली जाईल. या सोहळ्याला पु.भदंत धम्मशील थेरो (शिवणी), पु.भदंत पिंडोल (फुले पिंपळगाव) आणि पु.भदंत संघप्रिया थेरो (छत्रपती संभाजीनगर) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मदेसना संपन्न होईल.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा.बाबुरावजी पोटभरे (संस्थापक, बहुजन विकास मोर्चा) भूषवणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून मा.आ.प्रकाशदादा सोळंके (आमदार, माजलगाव विधानसभा) तर प्रमुख उपस्थिती मध्ये शिफा बिलाल चाऊस नवनिर्वाचित नगराध्यक्षा माजलगाव, राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक माजलगाव, दयानंद भाऊ स्वामी, सहालभैय्या चाऊस, डॉ.मिलिंद आव्हाड, श्रीहरी नाना मोरे, विजय दादा साळवे, कचरू तात्या खळगे, डॉ.प्रकाश आनंदगावकर, डॉ.श्रीराम खळगे, प्रकाश बन्सी कांबळे, अविनाश तात्या जावळे, नवनाथ धाईजे, धम्मानंद साळवे, भीमराव आप्पा टाकणखार, डॉ.अशोकराव तिडके, ड.नरहरी कांबळे, अभिजीत भैय्या पोटभरे, सदानंद भैया प्रधान, अशोक लांडगे सर, सचिन जावळे, विजय शिंदे, राज अहमद सय्यद नूर, प्रशांत शेटे, मेहमूद कुरेशी, जुनेद खान पठाण, सचिन डोंगरे, अंकुशराव जाधव, राजेश घोडे, राजेश साळवे, अविनाश बनसोडे, राकेश साळवे, भास्करराव घाडगे, महेंद्र टाकणखार, ड.रवींद्र टाकणखार, राहुलकुमार टाकणखार सर, ड.सुजीत कांबळे, सदाशिव भालेराव, के.व्ही साळवे, धम्मचारी अमोलरत्न, डॉ.भागवत साळवे आदी मान्यवर उपस्थित तसेच माजलगाव शहरासह जिल्ह्यातील विविध राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

कालवश, भिकाजीराव वाघमारे यांच्या परिवारातील विद्याताई साहेबराव निसर्गध, रोहिणी निवृत्ती भाले, सुनिता भिमराव टाकणखार, शालिनी अर्जुन गणकवार, सीमा ओमप्रकाश टाकणखार, योगिता कपिल गणकवार, प्रतिभा वसंत पंडित, अनंत नामदेव वाघमारे व यशोधरा बुद्ध विहार ट्रस्टच्या वतीने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. ट्रस्टचे अध्यक्ष प्रा.आर.एम. कांबळे, उपाध्यक्ष सुशिलाताई चांदमारे, सचिव बाबासाहेब जाधव सर व सर्व सदस्य या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत. सधम्म सेवा संघ, भारतीय बौद्ध महासभा आणि त्रिरत्न बौद्ध महासंघ या धार्मिक संघटनांचे विशेष सहकार्य या सोहळ्याला लाभले आहे. आयोजकांनी सर्व उपासक-उपासिकांना पांढरे वस्त्र परिधान करून या मंगलप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# बीड पालिकेचा 'उरफाटा' कारभार; सुविधांचा पत्ता नाही, पण दंड वसुलीसाठी कंबर कसली!

## शहरात 'मुतारी' नाही म्हणून नागरिक उघड्यावर, मग दंडाचा 'प्रसाद' कशासाठी? मुख्याधिकारी साहेब, जबाबदार कोण?

## १ एप्रिलचा 'मुहूर्त' साधून जनतेला 'एप्रिल फूल' बनवू नका; आधी कचरा व्यवस्थापन करा!

## बीड पालिकेचा 'तुघलकी' फतवा: स्वतःचे कर्मचारी भिंती रंगवतात, अन् जनतेकडून दंड वसूल करता?

**बीड । बिलाल शेख**

शहरात कचरा टाकला तर दंड आकारण्याचे 'जाहीर प्रकटन' देणाऱ्या बीड नगरपालिकेचा खरा चेहरा आता जनतेसमोर आला आहे. मुख्याधिकारी साहेब, आधी तुमच्या कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासा, तुमचेच कर्मचारी पालिकेच्या भिंती गुटखा थुंकून रंगवत आहेत. आधी त्यांना शिस्त लावा, मगच सामान्य जनतेला कायद्याचे डोस पाजा, अशा शब्दात बीडच्या नागरिकांनी पालिकेच्या दुटप्पी धोरणाचा समाचार घेतला आहे.



### आधी पालिकेतील 'गुटखा बहाद्दरांना' आवरा!

स्वतःचे घर सावरता येत नाही आणि जगाला शहाणपण सांगणाऱ्या पालिकेच्या कर्मचाऱ्यांचे कारनामेही काही कमी नाहीत. पालिकेच्या भिंतींवर गुटख्याच्या पिचकाऱ्या मारून त्या रंगवणाऱ्या कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्याची हिंमत मुख्याधिकाऱ्यांमध्ये आहे का? सीसीटीव्ही फुटेज तपासले तर अर्धी नगरपालिकाच दंडाच्या कचाट्यात येईल, इतकी घाण तिथे साचलेली आहे.

### स्वच्छतागृह नाही, म्हणून नागरिक हतबल!

बीड शहरातील मुख्य रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी एकाही सुस्थितीतील स्वच्छतागृहाचा पत्ता नाही. बाजारपेठेत किंवा कामासाठी आलेल्या नागरिकांना, महिलांना आणि वृद्धांना नैसर्गिक विधीसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे नाइलाजाने उघड्यावर किंवा कोपऱ्यात जावे लागते. शहरात स्वच्छतागृहांची सोय नसणे हा नगरपालिकेचा गुन्हा नाही का? मग यासाठी नगरपालिकेला दंड का लावू नये? असा थेट सवाल विचारला जात आहे.

### नागरिकांची सडेतोड मागणी: पालिकेलाही दंड लावा!

मुख्याधिकारी साहेब, केवळ वसुली करून तिजोरी भरणे हे नगरपालिकेचे काम नाही. नालीची स्वच्छता नाही, रिकाम्या भूखंडावर साचलेला कचरा उचलण्याची यंत्रणा नाही आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा व्यवस्थापन नाही. अशा परिस्थितीत जनतेकडून दंड वसूल करणे म्हणजे 'जुलूमशाही' आहे. जनतेची मागणी आहे की, जर सोयी-सुविधा देण्यात प्रशासन अपयशी ठरत असेल, तर प्रशासकीय अधिकाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई झालीच पाहिजे.

### कचरा कुंडीचा पत्ता नाही, घंटागाडीचा ठावठिकाणा नाही!

नगरपालिकेने १ एप्रिल २०२६ पासून दंडात्मक कारवाईची घोषणा केली खरी, पण प्रत्यक्षात शहरात कचरा व्यवस्थापनाचे धिंडवडे निघाले आहेत. प्रभागात कचरा कुंड्या कुठे आहेत? घंटागाडी वेळेवर येते का? नाल्यांची सफाई कधी झाली? या प्रश्नांची उत्तरे पालिकेकडे नाहीत. सोयी-सुविधा देण्याच्या नावावर शून्य असलेल्या प्रशासनाला केवळ नागरिकांच्या खिशावर दरोडा टाकण्यात रस आहे का, असा सवाल आता विचारला जात आहे.

बीड नगरपालिकेने १ एप्रिल २०२६ पासून शहरात कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्याचा फतवा काढला आहे. मात्र, या फतव्यामुळे शहरातील नागरिक कमालीचे संतापले असून, सुविधा शून्य आणि दंड मात्र हजारो रुपये अशा शब्दांत पालिकेच्या धोरणाचा निषेध केला जात आहे. आधी कचरा कुंड्या द्या, घंटागाडी वेळेवर पाठवा आणि मगच दंडाची भाषा करा, असा थेट इशारा आता बीडच्या जनतेने दिला आहे. नगरपालिका प्रशासन शहराला शिस्त लावण्याच्या गप्पा मारत असताना, खुद्द नगरपालिका कार्यालयाची अवस्था मात्र 'बदला'च्या पलीकडे आहे. पालिकेचे कर्मचारीच कार्यालयाच्या भिंती गुटखा आणि पान खाऊन रंगवत आहेत. मुख्याधिकाऱ्यांनी जर प्रामाणिकपणे कार्यालयाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले, तर स्वतःच्या कर्मचाऱ्यांचेच 'रंगारंग' कारनामे उघडकीस येतील. स्वतःच्या कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्यात अपयशी ठरलेले प्रशासन सामान्यांच्या खिशावर दरोडा टाकण्यासाठी सज्ज झाले आहे, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. कुठे आहेत कचरा कुंड्या? प्रत्येक प्रभागात कचरा टाकण्यासाठी पुरेशा कुंड्यांची व्यवस्था का नाही? घंटागाडीचा पत्ता नाही: अनेक भागांत घंटागाडी आठ-आठ दिवस फिरकत नाही, मग नागरिकांनी कचरा साठवायचा कुठे? कराचा मोबदला काय? शहरात सुसज्ज सार्वजनिक स्वच्छतागृहे का उभारली नाहीत? नागरिक वेळोवेळी कर भरतात, तरीही मूलभूत सुविधांसाठी त्यांना का वणवण फिरावे लागते? जर सोयीसुविधा न दिल्याबद्दल नगरपालिकेला दंड आकारण्याची तरतूद असती, तर आज बीड नगरपालिका डबघाईला आली असती. आधी सेवा द्या, मगच दंडाचा विचार करा, अशी प्रतिक्रिया बीडकरांनी दिली.





## हिंदू-मुस्लिम ऐकतेची परंपरा बीड शहरात कायम

### मरेपर्यंत एकतेसाठी काम करणार : खुर्शीद आलम

**बीड । प्रतिनिधी**

आज रामनवमी निमित्त नगरसेवक शेख अफसर भाई आणि नगरपरिषदेचे गटनेते खुर्शीद आलम यांनी मुस्लिम समाजातर्फे बार्शी नाका चौक येथे पानपोईचे आयोजन केले होते. शहरात रामनवमी चे आयोजन करण्यात येते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी हिंदू बांधवांनी बीड शहरात रामनवमी रॅली चे आयोजन केले होते. रॅली मध्ये सर्व रामभक्तंना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे म्हणून खुर्शीद आलम हे दरवर्षी हिंदू बांधवांसाठी मंडप लाऊन पिण्याचे पाणीची व्यवस्था करतात, दरवर्षी प्रमाणेच याही बीड नगरपरिषदेचे गटनेते खुर्शीद आलम आणि नगरसेवक शेख अफसर यांनी मुस्लिम समाजा तर्फे हिंदू बांधवांसाठी पाणपोई चे आयोजन केले आहे.



सदर पानपोईला सर्व राजकीय, सामाजिक व्यक्तीनी भेट देऊन गटनेते खुर्शीद आलम आणि नगरसेवक शेख अफसर यांचे कौतुक केले आहे. मिडियाशी बोलताना खुर्शीद आलम म्हणाले की आपण हिंदू मुस्लिम एकामेकांच्या सुखा दुःखात सामील होऊन एकजुटीने राहतोय हिच आपण सर्व भारतीयांची खरी ताकत आहे आणि मरे पर्यंत आम्ही सर्व भारतीय एकजुटीनेच राहणार असे सांगितले आहे. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख मैनोद्दीन भाई, शेख नजीर भाई, मसी सेठ, मोमीन शहेबाज, साजेद भाई, जाबेर कुरेशी, नवीद भाई, शहेजाद सौदागर, शेख शम्मो भाई, योनुस भाई बागवान, करीम खान यांच्यासह इतर मुस्लिम बांधवांनी परिश्रम घेतले आहे.

## आधी मृत्यूशी झुंज, आता सिस्टमशी लढाई!

### बीडच्या अमोल इंगोलेंचा वैद्यकीय अर्ज कामगार कार्यालयाने का फेटाळला? आमदार साहेब, न्याय द्या; पीडित कामगाराची थेट आमदारांकडे मागणी!

**बीड । प्रतिनिधी**

एकीकडे सरकार 'शासन आपल्या दारी'च्या गप्पा मारत असताना, दुसरीकडे बीडमध्ये एका गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या नोंदणीकृत बांधकाम कामगाराला सरकारी बाबूंच्या आडमुठ्या धोरणामुळे अन्यायाचा सामना करावा लागत आहे. मांजरसुंबा येथील रहिवासी अमोल उत्रेश्वर इंगोले या तरुण शेतकऱ्याने आणि कामगाराने प्रशासकीय जाचाला कंटाळून आता थेट लोकप्रतिनिधींकडे न्यायाची हाक दिली आहे. मांजरसुंबा (वैतागवाडी) येथील ३२ वर्षीय तरुण अमोल उत्रेश्वर इंगोले हे मजूरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांनी १५ एप्रिल २०२५ रोजी बांधकाम कामगार म्हणून अधिकृत नोंदणी केली होती.





दुर्दैवाने, त्यांना कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने ग्रासले. १९ मे २०२५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय बीड यांनी तसे अधिकृत वैद्यकीय प्रमाणपत्र (जा.क्र. डीएचबी/वैद्यकीय प्रमाणपत्र/३९०६/२०२५) दिले आहे.सध्या त्यांच्यावर 'जीवन अमृत' या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून, उपचाराचा मोठा खर्च त्यांनी उभा केला आहे. नियमानुसार, नोंदणीकृत कामगाराला मिळणाऱ्या वैद्यकीय मदतीसाठी त्यांनी सर्व मूळ कागदपत्रे आणि बिले कामगार कार्यालयात जमा केली होती. धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकरणाची सखोल चौकशी करून तालुका व्यवस्थापकांनी सर्व कागदपत्रे वैध असल्याचा अहवाल सादर केला होता. मात्र, जिल्हा स्तरावरील सरकारी कामगार अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक क्षुल्लक त्रुटी काढून हा अर्ज नामंजूर केल्याचा आरोप अमोल इंगोले यांनी केला आहे.

कॅन्सरसारख्या आजाराशी मी झुंज देत असताना, मदतीचा हात देण्याऐवजी सरकारी अधिकारी मानसिक त्रास देत आहेत. कागदपत्रांची पूर्तता असतानाही विनाकारण अर्ज फेटाळणे हा माझ्या जगण्याच्या हक्कावर गदा आणण्याचा प्रकार आहे.

**- अमोल उत्रेश्वर इंगोले (पीडित कामगार)**

### आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडे न्यायाची मागणी

या अन्यायाविरुद्ध आता अमोल इंगोले यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी या विषयात तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे. एका गरीब कष्टकरी तरुणाला त्याच्या हक्काचे पैसे मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला जाब विचारावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास, कामगार संघटना आणि स्थानिक नागरिक याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याच्या तयारीत आहेत.

## बत्तीगुलचा कहर! पाली गाव पंधरा दिवसापासून अंधारात

### विद्युत पुरवठा सुरळीत करा अन्यथा आंदोलन : सरपंच वीर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरानजीक असलेल्या पाली गावात सतत होणाऱ्या वीज खंडिततेमुळे ग्रामस्थ अक्षरशः वैतागले असून महावितरणच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. वारंवार बत्तीगुल होत असल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून शेतीची कामेही ठप्प पडत आहेत. पिकांवर याचा थेट परिणाम होत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.



गावामध्ये अनेक ठिकाणी डीपी (ट्रान्सफॉर्मर) उघड्या अवस्थेत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांसह मुक्या जनावरांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. याशिवाय अनेक वीज खांबांवरील तारा लोमकळत असल्याने दुर्घटनेची शक्यता अधिकच वाढली आहे. कोणतीही मोठी जीवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी महावितरणवरच राहील, असा इशारा सरपंच महेंद्र वीर यांनी दिला आहे.

दरम्यान, वारंवार तक्रारी करूनही लाईनमन आणि संबंधित अभियंते उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलली जात नसल्याने ग्रामस्थांचा संताप उफाळून आला आहे. तसेच सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असून याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर देखील होत आहे. वीजपुरवठा तात्काळ सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सरपंच महेंद्र वीर यांनी दिला असून, महावितरणच्या निष्क्रिय आणि बेफिकीर कारभाराविरोधात ग्रामस्थ आता आक्रमक पवित्रा घेण्याच्या तयारीत आहेत.

## उद्देशाला हरताळ; जिल्हास्तरीय महिला बचत गटांचे विक्री प्रदर्शन भरले हॉटेलात

### जिल्हा व महिला विकास विभागाच्या लाखो रुपयांची उधळपट्टी!

**बेजबाबदार अधिकाऱ्यांवर महिला व बालकल्याण मंत्र्यांनी निलंबनाची कारवाई करावी : कुलदीप करपे**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सध्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने २०२६ मधिल जिल्हास्तरीय महिला बचत गटांच्या उत्पादित केलेल्या मालांचे दि.२७ मार्च ते २९ मार्च २०२६ असे तिनदिवसीय विक्री महोत्सव /प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सदर प्रदर्शन सुमारे सव्वादोन लाख लोकसंख्या असलेल्या बीड शहरात जालना रोडवरील हॉटेल यशराज इन येथे आयोजित केले आहे. वास्तविकता ग्रामीण भागातील महिला बचत गटातील सदस्यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांना खरेदी -विक्री चे व्यवहारिक ज्ञान मिळावे, शहरातील ग्राहकांना ग्रामीण भागातील दर्जेदार, वस्तू उत्पादनांची विक्री व्हावी आदी उद्देशांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळ दरवर्षी लाखो रुपये खर्च करून शहराच्या, जिल्ह्याच्या ठिकाणी ग्रामीण महिला बचत गटांच्या वतीने उत्पादित



मालांचे वस्तूंचे विक्री प्रदर्शन /महोत्सव आयोजन करत असते परंतु काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे सदर विक्री प्रदर्शनाच्या उद्देशालाच हरताळ फासल्याचे समोर आले आहे.

बीड शहरातील सार्वजनिक ठिकाणी सदर महोत्सवाचे प्रदर्शनाचे आयोजन करणे आवश्यक असताना एका व्यावसायिक हॉटेलमध्ये अत्यंत तोकड्या जागेत जिल्ह्यातून फक्त ३५ स्टॉलचे प्रदर्शन आयोजन केले आहे. तीन दिवसाच्या प्रदर्शनामध्ये महिला व बालकल्याण विभागाचे लाखो रुपये या ठिकाणी खर्च केले जाणार असून सहभागी झालेल्या ३५ स्टॉलधारक महिलांना याबाबत विचारणा केली असता आयोजकांवर त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कारण त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री अपेक्षेप्रमाणे झाली नसल्याचे सांगितले आहे. ज्या ठिकाणी ग्राहक वर्ग उपलब्ध आहे त्या सार्वजनिक ठिकाणी सदर प्रदर्शनाचे आयोजन केले असते तर महिलांना अधिक बाजारपेठ मिळाली असती मात्र शासनाचे लाखो रुपये खर्च दाखवून हडप करायच्या लालचे पोटी सदर प्रदर्शनाचे एका व्यवसायिक हॉटेलमध्ये तोकड्या जागेत आयोजन केले आहे ही गंभीर बाब क्रांतिकारी शेतकरी संघटनेने समोर आणली असून महिला व बालकल्याण मंत्री ना.अदिती तटकरे यांच्याकडेसविस्तर तक्रार करून बेजबाबदार अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी दिली.

## दिव्यांग नागरिकांनी ३१ मार्चपूर्वी यूडीआयडी कार्ड आधारशी लिंक करावे : पटेल व नाईकवाडे

**बीड । प्रतिनिधी**

शासनाच्या विविध दिव्यांग कल्याणकारी योजनांचा लाभ अखंडपणे मिळण्यासाठी दिव्यांग नागरिकांनी आपले यूडीआयडी कार्ड आधारशी लिंक करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासाठी ३१ मार्च २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असून, या मुदतीपुर्वी लिंकिंग न केल्यास संबंधित अनुदान व लाभ बंद होऊ शकतात, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दिव्यांग नागरिकांकडे यूडीआयडी कार्ड उपलब्ध असले तरी अद्याप अनेकांनी आधार लिंकिंगची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे अशा नागरिकांना शासनाच्या योजनांपासून वंचित राहण्याची शक्यता आहे.





यासंदर्भात बीड नगर परिषदेचे गटनेते फारुख पटेल व नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी बीड शहरातील सर्व दिव्यांग नागरिकांना तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, दिव्यांग बांधवांनी शासनाच्या योजनांचा लाभ सुरळीतपणे मिळवण्यासाठी यूडीआयडी कार्ड आधारशी लिंक करणे अत्यंत गरजेचे आहे. अंतिम मुदत जवळ येत असल्याने विलंब न करता प्रक्रिया पूर्ण करावी. दिव्यांग नागरिकांनी लिंकिंग कशी करावी? www.swavlambancard.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच, आवश्यक असल्यास संबंधित शासकीय कार्यालयात प्रत्यक्ष जाऊनही मदत घेता येईल. अर्ज करताना आधार क्रमांक, यूडीआयडी कार्ड व आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत. शासनाच्या विविध योजना, अनुदाने व सुविधा नियमितपणे मिळण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असल्याने बीड शहरातील सर्व दिव्यांग नागरिकांनी ३१ मार्चपूर्वीच यूडीआयडी-आधार लिंकिंग पूर्ण करावे, असे आवाहन शेवटी फारुख पटेल व अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. ※वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com